महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८३ /२०२४ दि. १८/०४/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

*****

**ज्याअर्थी, कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे** हद्दीत मे. रचना कन्स्ट्रक्शन लि. यांचे वतीने दि. १८/०४/२०२४ ते दि. १९/०४/२०२४ रोजीपावेतो नाशिक–मुंबई महामार्गावर रूस्तमजी समोर पादचारी पुलाचा स्टील गर्डर क्रेनचे सहाय्याने बसविण्यात येणार आहे. सदर वेळी नाशिक कडून मुंबई कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवावी लागणार आहे. सदर वेळी नाशिक कडून मुंबई कडे जाणारी जड, अवजड व हलकी वाहने पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नाशिककडून मुंबईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खारेगाव टोलनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने खारेगाव टोलनाका येथून डावे वळण घेवून गॅमन कडून रेतीबंदर मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) न्हावाशेवा, जे.एन.पी.टी. कडून मुंब्रा खारेगाव टोलनाका, घोडबंदर मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गॅमन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गॅमन येथून पुढे जावून खारेगांव टोलनाका येथून डावे वळण घेवून मुंबई नाशिक महामार्गाने पुढे माणकोलीनाका येथून डावे वळण घेवून खारबांव वसई रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. १८/०४/२०२४ रोजी रात्रौ २३:५९ ते दि. १९/०४/२०२४ रोजी ०४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>
संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner